# जवाहर नवोदय विद्यालय, गढी जि. बीड

## निविदा फार्म

( नियम व अटी २०१४-१५ )

खालील मालाच्या खरेदीकरिता संबंधित पुरवठाधारक/उत्पादक/अधिकत विक्रते/नोंदणीकत आणि प्रतिष्ठीत कंपन्या/सेवाप्रदाते यांच्याकडुन सिलबंद निविदा(तांत्रिक निविदा व आर्थिकनिविदा)२०१४-१५या वर्षाकरीता मागविण्यात येत आहेत

तक्ताक्रमांक १

| अ. क्र. | मालाचा तपशिल | इसारा **रक्कम** | अ. क्र. | मालाचा तपशिल | इसारा **रक्कम** |
|---|---|---|---|---|---|
| १ | किराणा व भूसार | १०००० | ११ | विज्ञान साहित्य | १००० |
| २ | भाजीपाला | ५००० | १२ | खेळाचे साहित्य | २००० |
| ३ | फळे | ५००० | १३ | स्टेशनरी ˘ कार्यालयीण व विद्यार्थी | ५००० |
| ४ | बेकरी साहित्य | २००० | १४ | स्कूल बॅग | २००० |
| ५ | दुध व दुग्धजन्य पदार्थ | ५००० | १५ | बेडिंग अॅटम | १००० |
| ६ | मटण, चिकण, अंडी | २००० | १६ | इमारतीसाठी रंग पुरवठा | २००० |
| ७ | टि शर्ट, ट्रॅकसुट व स्वेटर | २००० | १७ | रंगकाम मजुरी | २००० |
| ८ | गणेवेश शिलाई | ५००० | १८ | गणवेश धुलाई व इस्त्री | १००० |
| ९ | श्युज, चप्पल, सॉक्स | ५००० | १९ | संगणक रखरखाव व दुरुस्ती | २००० |
| १० | टॅकरद्वारे पिण्याचे पाणि पुरवठा | ५००० | २० | इलेक्ट्रीकल साहित्य | २००० |
| | | | २१ | मुलांचे हेअर कटींग | १००० |

## निविदा धारकांसाठी सूचना

- निविदा दोन वेगवेगळया लिफापयात भरावयाच्या आहेत.
- पहिल्या लिफापयास **तांत्रिक लिफाफा** व दुस-या लिफापयास **व्यापारी** अथवा **दरासंबंधीचा लिफाफा** संबोधले जाईल.

**अ पहिल्या लिफाफयात खालील प्रमाणे दस्तऐवज असावेत.**

१ उचित बयाना रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट जो की, **प्राचार्य नवोदय विद्यालय,गढी** यांच्या नावे कोणत्याही राष्टीयकृत बॅंकेचा, शाखा गेवराई येथे देय असलेला असावा. चेक किंवा गेवराई शहरा बाहेरील शाखेवर देय असलेला डिमांड ड्राफ्ट स्विकारला जाणार नाही.

२ संस्थेच्या/व्यवसायाच्या नावाचे व्हॅट/टीन बाबतचे प्रमाण पत्र. (ज्या वस्तुच्या विक्रीसाठी अवश्यकता आहे.)

३ मुंबई दुकान अधिनियम अंतर्गत चालु स्थितीतील व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र, (ज्या ठीकाणी हे प्रमाणपत्र लागु होत नसेल त्यांनी तसे संबधीत अधिका-याचे तसे प्रमाणपत्र जोडावे )

४. आयकर विभागाने दीलेले संस्थेच्या अथवा मालकाच्या नावचे पॅनकार्ड ची झेराक्स प्रत.

५. निविदा सोबत देण्यात आलेले सर्व अटी मान्य असल्या बाबतचे प्रमाणपत्र

६. निविदाधारक ज्या वस्तुची निवीदा भरत असेल त्या वस्तुचा पुरवठा करण्याचा पुर्वअनुभव असेल तर तसे प्रमाणपत्र सोबत जोडावे.

**ब दुस-या लिफाफयात खालील कागदपत्रे असतील.**

१ निविदा धारकाने स्वतःसाठी खरेदी केलेली व स्वतः स्वाक्षरी केलेले सर्व समाविष्ट दर दर्शविणारे विहित निविदा प्रपत्र. (FINANCIAL BID )

वरिल दोन्ही लिफाफे वेगवेगळे मोहर बंद करावे, **पहिल्या लिफाफा क्रमांक १, तांत्रिक निविदा लिफाफा, क्र.२ व्यापारी दरासंबंधीचा लिफाफा असे लालशाईने स्पष्ट लिहावे.** या दोन्ही लिफापया बरोबर आवश्यक वस्तुंचे नमुनेपण द्यावेत तसेच लिफापयावर निविदाधारकांचे नाव व पत्ता तसेच स्वतःचा दुरध्वनी / भ्रमनदुरध्वनी कंमाक लीहावा प्रथम तांत्रीक लिफाफा उघडण्यात येईल व ज्या निविदा तांत्रीक दृष्टया पात्र ठरतील त्याचाच लिफाफा कंमाक दोन म्हणजेच दरपत्रक लिफाफा उघडण्यात येईल.

## नियम व अटी :

१ को-या निविदा, अटी व शर्तीसह वि+ालयाच्या कार्यालयातून रु १००/- रोख व भरणा करुन दिनांक २२/०५/२०१४ ते १०/०६/२०१४ पर्यंत सकाळी १० ते दुपारी ५.०० वाजेपर्यंत **(**सुट्टीचे दिवस वगळून**)** मिळू शक्तील.

२ सर्व निविदा माहितीसह विद्यालयाच्या **www.jnvbeed.gov.in**, and http://eprocure.gov.in/cppp वेबसाई वरुन डाऊन लोड करुन भरता येतील मात्र आशा निविदांसोबत लिफाफा क्रमांक १ मध्ये विना परतावा असलेला रु १००/-चा प्राचार्य जवाहर नवोदय विद्यालय गढी यांचे नावे कोणत्याही राष्ट्रीय कृत बॅकेचा गेवराई शाखेवर काढलेला धनादेश जोडावा.

३ भरलेल्या मोहरबंद निविदा अर्ज पोस्टाने किंवा प्रत्यक्ष दिनांक १२/०६/२०१४ दुपारी ०४.००पर्यंत सादर करण्यात याव्यात दिलेल्या तारखे नंतर व वेळे नंतर प्राप्त झालेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाहीत याची नोंद घ्यावी. निविदा पोस्टाद्वारे उशिरा प्राप्त झाल्यास सर्वस्वी जबाबदारी निविदा धांरकाची असेल.

४ निविदा दिनांक १४/०६/२०१४ वेळ सकाळी ११.०० वाजता, प्राचार्य जवाहर नवोदय विद्यालय, गढी यांच्या कार्यालयात उघडण्यात येतील. काही अपरिहार्य कारणामुळे निविदा उघडण्यात न आल्यास निविदा उघडण्याची बदललेली तारीख संबंधितांना कळविण्यात येईल, किंवा विद्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात येईल.

५. ज्या निविदाधारकांनी निविदा फॉर्म विद्यालयामधून खरेदी केले आहेत अथवा विद्यालयाने प्रसिध्द केलेल्या जाहिरातीला अनुसरुन दिलेल्या बेबसाईट वरुन काढून भरले आहेत अशा निविदा फॉर्म हे ग्राहय धरले जातील व तेच निविदाधारका अथवा त्यांचे प्रतिनिधी हे विद्यालयातील निविदा खुल्या करते वेळी उपस्थित राहू शकतील- इतर कोणत्याही व्यक्तीस निविदा खुल्या करते वेळी बैठकिस बसू दिले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

६. या निविदा विद्यालय पातळीवरील खरेदी सल्लागार समिती समोर उघडण्यात येतील व वस्तुची प्रत दर्जा, वस्तुचे दर व इतर त्यासंबंधी बाबीवर खरेदी समितीचा निर्णय अंतिम राहील.निविदा उघडल्या नंतर सर्व निविदांच्या कागदपत्रांची तपासणी करुन समिती ज्या निविदा पात्र आहेत किंवा अपात्र आहेत याची सुचना संबंधितांना देण्यात येईल-

७. एका वस्तूचे एका पेक्षा जास्त दर निविदा अर्जात नमुद करु नये असे केल्यास कमी असलेले दरच विचारात घेण्यात येतील.

८. एकदा भरलेले दर खाडाखोड करु नये, जर दरात बदल करावयाचा असल्यास अगोदर लिहीलेल्या रक्कमे भोवती गोल करुन दुसरी रक्कम वरच्या बाजूस लिहावी व निवीदा धारकांने सही करावी.

९. उचित बयाना रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट जो की, **प्राचार्य नवोदय विद्यालय,गढी** यांच्या नावे कोणत्याही राष्टीयकृत बॅकेचा, शाखा गेवराई येथे देय असलेला असावा. चेक किंवा गेवराई शहरा बाहेरील शाखेवर देय असलेला डिमांड ड्राफ्ट स्विकारला जाणार नाही व निविदा रद्द करण्यात येईल.

१०. मंजूर झालेल्या निविदाधांरकास खालील प्रमाणे डिपॉजिट भरणे आवश्यक आहे. इसार रक्कम ही डिपॉजीट मध्ये वळती करण्यात येईल, व डिपॉजीट पुरवठा कालावधी पुर्ण होईपर्यंत विद्यालयाकडे जमा राहील व त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज दीले जानार नाही.

**तक्ता कमांक २**

| अ.क्र. | मालाचा तपशिल | सुरक्षारक्कम | अ.क्र | मालाचा तपशिल | सुरक्षा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | किराणा व भूसार | ५०००० | ११ | विज्ञान साहित्य | ५००० |
| २ | भाजीपाला | २०००० | १२ | खेळाचे साहित्य | ५००० |
| ३ | फळे | २०००० | १३ | स्टेशनरी ँ कार्यालयीण व विद्यार्थी | ५००० |
| ४ | बेकरी साहित्य | ५००० | १४ | स्कूल बॅग | २००० |
| ५ | दुध व दुग्धजन्य पदार्थ | ५००० | १५ | बेडिंग ॲटम | ५००० |
| ६ | मटण, चिकण, अंडी | ५००० | १६ | इमारतीसाठी रंग पुरवठा | ५००० |
| ७ | टि शर्ट, ट्रॅकसुट व स्वेटर | ५००० | १७ | रंगकाम मजुरी | ५००० |
| ८ | गणेवेश शिलाई | १५००० | १८ | गणवेश धुलाई व इस्त्री | ५००० |
| ९ | श्युज, चप्पल, सॉक्स | १०००० | १९ | संगणक रखरखाव व दुरुस्ती | २००० |
| १० | टॅकरद्वारे पिण्याचे पाणि पुरवठा | १०००० | २० | इलेक्ट्रीकल साहित्य | २००० |
| | | | २१ | मुलांचे हेअर कटींग | १००० |

११. जर एखादया निविदाधारकाने इसारा रक्कम काही करणास्तव भरली नसेल तर त्याचे कारण नमुद करणे आवश्यक आहे- अशा प्रकारच्या निविदा स्विकृत करावयाच्या किंवा नाहीत याचा अधिकार कय समितीला राहिल.

१२. निविदा मंजूर झाल्यानंतर प्राचार्य, जवाहर नवोदय विद्यालय, पलूस व निविदाधारक यांचे दरम्यान रु-१००/- च्या स्टॅपपेपरवर करार केला जाईल व हा करार निविदेतील अटी व शर्तीनुसार पुरवठादारावर बंधनकारक राहील.

१३. स्विकारण्यात येणा-या निविदा ३०-०४-२०१५ पर्यंत वैध राहतील तथापी कंत्राट अस्तित्वात येण्यास काही अपरिहार्य कारणास्तव विलंब झाल्यास दरम्यानच्या काळात सध्याच्या कंत्राटदारास याच नियम व आटी प्रमाणे मालाचा पुरवठा करावा लागेल, याबाबत निविदाधारकास,नियम व अटी पुरवठयाच्या सर्व तपशीला -सह लेखी करारनामा करणे बंधनकारक राहिल.

१४. निविदेत दिलेले दर सर्व करासहित असावेत व माल वेळो वेळी प्राचार्य किंवा ते अधीकृत करतील त्यांच्या आदेशाप्रमाणे विद्यालयाच्या वस्तीगृहा पर्यंत पुरवठा करावा लागेल. निविदेतील दर हे छापील किंमतीपेक्षा जास्त नसावेत.

१५. निविदेतील सर्व वस्तूंचे दर हे छापील किंमती (MRP) पेक्षा जास्त नसावेत- पुरवठा करण्यात येणां-या वस्तुचे दर भविष्यात कमी झाल्यास एम-आर-पी- प्रमाणे बीलाची रक्कम अदा करण्यात येईल- ब्रॅड साहित्यासोबत ज्या काही ऑफर असतील त्या उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहिल.

१६. स्विकृत निविदा प्रमाणे सर्व मालाचा पुरवठा विद्यालयाच्या आदेशाप्रमाणे वेळेवर दिलेल्या नमुन्याप्रमाणे व वर्णना प्रमाणे करावा. पुरवठा केलेला माल आवश्यकता भासल्यास तज्ञ व्यक्ती कडून तपासुन घेण्यात येईल, माल वर्णना प्रमाणे नसल्यास बदलून देण्याची जबाबदारी निविदाधारकांची असेल तसे न केल्यास पुरवठा धारकावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. व सदरील माल खुल्या बाजारातून खरेदी करुन विद्यालयास झालेले नुकसान निविदाधारकाच्या अनामत रक्कमेतून कपात करण्यात येईल.

१७. पुरवठाधारक ज्या वाहनादवारे विद्यालयात पुरवठा करण्यात येणा-या वस्तू पोहोच करणार आहे त्याची विद्यालयाच्या गेटवर नोंद होईल (वाहन आलेली वेळ व गेलीली वेळ)- पुरवठाधारकाने वाहनाबरोबर मालाची चढउतार करण्यासाठी ज्या वाहकाची अथवा कामगारांची नेमणूक केलेली त्यांनी त्या वस्तूची हताळणी व्यवस्थीत करणे गरजेचे आहे- तसेच कोणत्याही पुरवठादारास सायकांळी ६ ते सकाळी ६ विद्यालयात प्रवेश दिला जाणार नाही अथवा तो कोणत्याही परीस्थीतीत वास्तव्य करु शकणार नाही याची नोंद घ्यावी.

१८. केवळ कमीत कमी दर असणारी निविदा पूर्णत् अथवा अशता स्विकारणे बंधनकारक नाही तर नमून्याच्या आधारे च दर मंजूर करावयाचा कय समितीने राखून ठेवला आहे- तसेच मंजूर निविदा ही निविदाधारकाकडून (पुर्ण किंवा काही भाग) इतर पुरवठादारास हस्तांतरीत करता येणार नाही.

१९. दिर्घकाळ टिकाऊ वस्तु उदा- फर्निचर ई- साठी पुरवठाधारकाचे आवश्यक ती वारंटी / गॅरन्टी देणे आवश्यक आहे- तसेच हमीपत्र ज्या कालावधी पुरते मर्यादित आहे, तो पर्यंत अनामत रक्कम व सुरक्षा रक्कम कालावधी पुर्ण होई पर्यंत मिळणार नाही याची दक्षता घ्यावी.

२०. स्विकृत निविदा व अटी प्रमाणे विद्यालयास मालाचा पुरवठा वेळेवर आवश्यक त्या प्रमाणात किंवा व्यवस्थित न पुरवल्यास विद्यालय अन्य विविदाधारकाकडुन मालाची खरेदी करु शकेल किंवा खुल्या बाजारातून खरेदी करण्यात येईल अशा खरेदीमुळे विद्यालयास झालेले नुकसान अनामत रक्कमे पेक्षा जास्तअसेल तर अशा पुरवठादारा विरुध्द नुकसान भरपाई साठी कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते. तसेच अनामत रक्कम जप्त करुन सदर पुरवठाधारकांचे नाव काळया यादीत (Blacklist) समावीष्ट करण्यात येईल.

२१. निविदेसोबत वस्तूचा नमूना देणे अवश्यक आहे. या नमुन्यावर दुकानदार/संस्थेचा शिक्का व स्वाक्षरी असावी मात्र फर्निचर करीता मान्य झालेल्या निविदा धारकांने विद्यालय आदेश देईल त्यावेळेस नमुना सादर करावा.

२२. निविदेतील कोणत्याही वस्तू खरेदि करणे अथवा न करणे विद्यालयाच्या गरजे प्रमाणे तसेच उपलब्ध निधीवर अवलंबून राहील.

२३. पुरवठाधारक विद्यालयाने दिलेल्या आदेशानुसार ठरविक बाबी पुरवित नसेल तर त्याचा कय समितीने निश्चित केलेल्या विलंब शुल्क/दंड नुसार रक्कम वसुल केली जाईल.

२४. १९६१ चे आयकर कायदाचे कलम १९४ अ मधील तरतुदीनुसार लागु असलेला आयकर ठेकेदारास कंत्राटाची रक्कम अदा करतांना देय रक्कमेतून आयकर नियमानूसार कपात करण्यात येईल.

२५ निविदा धारकाकडुन घालण्यात आलेल्या कोणत्याही अटी विद्यालयावर बंधनकारक राहणार नाहीत.

२६. अधिक माहिती व निविदा भरण्यास काही अडचण आल्यास प्राचार्य, जवाहर नवोदय विद्यालय, गढी जि. बीड यांच्याशी संपर्क साधावा- संपर्कासाठी दुरध्वनी कमांक (०२४४७) २५९६०७, फॅक्स कमांक २५९४९१

२७. कोणतीही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे सर्व अधिकार प्राचार्य जवाहर नवोदय विद्यालय, गढी यांनी राखून ठेवला आहे.

२८. पुरवठा केलेल्या मालासोबत दोन प्रतित बिल देने आवश्यक आहे.

२९. वरील अटी या सर्वसामान्य असून विशेष वस्तू संबंधी विशेष अटी संबंधित निविदा फॉर्म वर दिलेल्या आहेत .त्या लागू राहतील.

३०. निविदा सुचने संबंधी कोणतेही वाद हे गेवराई/ बीड न्यायालयाच्या अंतर्गत असतील.

नोट :- वरील पैकी कोणत्याही नियम व आटीच्या संदर्भात मतभेद आसल्यास मुळ इंग्रजी प्रत ग्राहय धरली जाईल.

प्राचार्य
जवाहर नवोदय विद्यालय, गढी

---

**हे प्रमाणपत्र पाकिट कंमाक ०१ मध्ये टाकावे**

**-:प्रमाणपत्र :-**

निविदा फार्म सोबत व दरपत्रकातील सर्व नियम व अटी, मी वाचले असुन त्या मला किंवा आमच्या संस्थेस मान्य असून बंधनकारक आहे. म्हणून त्या स्विकृत करुन स्वाक्षरीसह सोबत जोडत आहे.

**निविदाधारकाची सही व शिक्का**